म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का० वा०
दा. क्र. ३१५८

# काश्मीरचें रणकंदन

IRBK-0103159
IRBK-0103159

म. ग्रं. सं. ठाणें
विषय वाङ्मय
वा. नं. २४०





# काश्मीरचें रणकंदन

म. ग्र. सं. ठाणें.

लेखक:

य. द. लोकुरकर

दिल्ली

प्रस्तावना:

ना. काकासाहेब गाडगीळ

IRBK-0103159

IRBK-0103159

३९५८

किंमत आठ आणे

मुद्रक :
एम्. व्ही. पोरे.
चैतन्य प्रेस,
६९१ बुधवार, पुणें २.

• • •

प्रकाशक :
के. एस्. गुते.
६९१ बुधवार, पुणें २.

• • •

एकमेव विक्रेते :
चित्रशाळा प्रेस,
प्रकाशन विभाग,
पुणें २.

# जन्मकथा !

श्रीनगर-जम्मूहून परत आल्यावर काश्मीर-प्रकरणाविषयीं अनेक लोकांनीं नाना तऱ्हेचे प्रश्न मला विचारले. त्यांची उत्सुकता पाहून मला त्या विषयावर एक दोन लेखांक लिहिले तर बरें असें वाटलें.

लेखांक लिहावयास बसल्यावर मजकूर मारुतीच्या शेपटासारखा वाढत गेला व लेखांकांचें रूपांतर लेखमालेंत झालें.

साहाजिकच चोपडयाची कल्पना सुचली. पण ‘ कोण छापा-वयाला बसलाय ’ असें वाटत असतांच श्री. मामासाहेब देवगिरीकर यांनीं दिल्लींतील भेटींत हें प्रकाशन अंगीकारण्याची तत्परता दर्शि-विली. हीच या पुस्तकाची जन्मकथा !

या पुस्तकांतील छायाचित्रें छायाचित्रकार श्री. नटराजन्, हिंदी सैन्यप्रकाशन विभाग, आणि दिल्लींतील काश्मीर माहिती-संस्था यांच्या सौजन्यानें उपलब्ध झालीं. त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहें.

मजकूर लिहीत असतां व लिहिल्यावर माझ्या अनेक व्यवसाय-बंधु स्नेही-हितचिंतकांनीं उपयुक्त सूचना केल्या व मार्गदर्शन केलें. त्यांचा नामोल्लेख त्यांना रुचणार नाहीं. त्या अनामिकांचाही मी कृतज्ञ आहें.

अल्पावधींत पुस्तकाचें मुद्रण-प्रकाशन पुरें केल्याबद्दल चित्रशाळा मुद्रणालय, चित्रशाळा प्रकाशन, यांचा मी आभारी आहें.

भारताच्या राज्यव्यवस्थेची धुरा स्कंधावर वहात असतांच वेळांत वेळ काढून नामदार न. वि. उर्फ काकासाहेब गाडगीळ यांनीं या पुस्तिकेला प्रस्तावना लिहून दिली. औपचारिकतेचा त्यांना—व मलाहि—तिटकारा आहे. तरीहि त्याबद्दल मी हार्दिक उपकृतता व्यक्त न करेन तर कृतघ्न ठरेन.

शेवटीं सांगणें एकच. या पुस्तकांत कांहीं गुण असतील त्यांत मी केवळ अंशभागी आहें. दोष मात्र सँर्वस्वीं माझेच.

नवी दिल्ली,
दि. १७, जानेवारी १९४८.

य. द. लोकुरकर.

म. ग्रं. सं. ठाणे.

# काश्मीरचा प्रश्न

गुलाबाला कांटे असतात व त्याचा सुवास चांगला असला तरी तें फूल चांगल्या रीतीनें न हाताळल्यास कांट्याची बोंच सहन करावी लागते. तसेंच थोडेंसें काश्मीरच्या प्रश्नाबाबत झालें आहे.

काश्मीरच्या प्रश्नाबाबत हिंदुस्थान सरकारची भूमिका आंतरराष्ट्रीय नीति व कायदा यांना धरून आहे. काश्मीरांतील प्रश्न म्हणजे ध्येयनिष्ठ प्रजातंत्र व गुंड झोटिंगशाही यांच्यांतील लढा आहे. एका दृष्टीनें आज काश्मीर म्हणजे महायुद्धापूर्वीचें स्पेन झालें आहे. आणि म्हणून या प्रश्नाची संपूर्णपणें माहिती सामान्य जनतेला होणें आवश्यक आहे. काश्मिरी जनतेला आपलें राजकीय भवितव्य ठरविण्याचा संपूर्ण हक्क आहे व तिनें जेव्हां आपल्या अधिकृत पुढाऱ्यांमार्फत हिंदुस्थान सरकारला विनंति केली तेव्हांच हिंदुस्थान सरकारनें सैन्य धाडलें आहे. युद्धानेंच निकाल लावावयाचा असेल तर भिण्याचें कांहींच कारण नाहीं. यू. एन्. ओ. नें जर जनमत घेऊन निकाल लावावा असें मान्य केलें म्हणजे तोच न्याय हैदराबादलाहि लावला जाईल.

काश्मीर प्रश्नाबाबत प्रत्यक्ष वस्तुस्थिति कशी आहे याची माहिती या छोट्या पुस्तकांत श्री. लोकुरकर यांनीं दिली आहे. हें छोटें चोपडें मराठी वाचकांना माहिती देईल व त्याचप्रमाणें पुढील घटनांबाबत मार्गदर्शनही करील अशी आशा आहे.

२६, फेरोजशहा रोड,
नवी दिल्ली.
दि. २४ जानेवारी १९४७.

न. वि. गाडगीळ.

भारताच्या राज्यव्यवस्थेची धुरा स्कंधावर वहात असतांच वेळांत वेळ काढून नामदार न. वि. उर्फ काकासाहेब गाडगीळ यांनीं या पुस्तिकेला प्रस्तावना लिहून दिली. औपचारिकतेचा त्यांना—व मलाहि—तिटकारा आहे. तरीहि त्याबद्दल मी हार्दिक उपकृतता व्यक्त न करेन तर कृतघ्न ठरेन.

शेवटीं सांगणें एकच. या पुस्तकांत कांहीं गुण असतील त्यांत मी केवळ अंशभागी आहें. दोष मात्र सर्वस्वीं माझेच.

नवी दिल्ली,
दि. १७, जानेवारी १९४८. } य. द. लोकुरकर.

म. ग्रं. सं. ठाणे.

# काश्मीरचा प्रश्न


गुलाबाला कांटे असतात व त्याचा सुवास चांगला असला तरी तें फूल चांगल्या रीतीनें न हाताळल्यास कांट्याची बोंच सहन करावी लागते. तसेंच थोडेंसें काश्मीरच्या प्रश्नाबाबत झालें आहे.

काश्मीरच्या प्रश्नाबाबत हिंदुस्थान सरकारची भूमिका आंतरराष्ट्रीय नीति व कायदा यांना धरून आहे. काश्मीरांतील प्रश्न म्हणजे ध्येयनिष्ठ प्रजातंत्र व गुंड झोटिंगशाही यांच्यांतील लढा आहे. एका दृष्टीनें आज काश्मीर म्हणजे महायुद्धापूर्वीचें स्पेन झालें आहे. आणि म्हणून या प्रश्नाची संपूर्णपणें माहिती सामान्य जनतेला होणें आवश्यक आहे. काश्मिरी जनतेला आपलें राजकीय भवितव्य ठरविण्याचा संपूर्ण हक्क आहे व तिनें जेव्हां आपल्या अधिकृत पुढाऱ्यांमार्फत हिंदुस्थान सरकारला विनंति केली तेव्हांच हिंदुस्थान सरकारनें सैन्य धाडलें आहे. युद्धानेंच निकाल लावावयाचा असेल तर भिण्याचें कांहींच कारण नाहीं. यू. एन्. ओ. नें जर जनमत घेऊन निकाल लावावा असें मान्य केलें म्हणजे तोच न्याय हैदराबादलाहि लावला जाईल.

काश्मीर प्रश्नाबाबत प्रत्यक्ष वस्तुस्थिति कशी आहे याची माहिती या छोट्या पुस्तकांत श्री. लोकुरकर यांनीं दिली आहे. हें छोटें चोपडें मराठी वाचकांना माहिती देईल व त्याचप्रमाणें पुढील घटनांबाबत मार्गदर्शनही करील अशी आशा आहे.

२६, फेरोजशहा रोड,
नवी दिल्ली.
दि. २४ जानेवारी १९४७.

न. वि. गाडगीळ.



गिलगित
मुझफराबाद
टिटवल
दोमेल
बंदीपूर
मानशेरा
बारामुला
अॅबाटाबाद
पट्टण
श्रीनगर
उरी
बाघ
मरी
अवन्तीपुरा
पूंच
अनंतनाग
पलंदरी
रावळपिंडी
मेंधार
कहुटा
कोटली
सेनग्रा
रजौरी
झांगर
चिंगस
मीरपूर
नौशेरा
मंगला
सादाबाद
भिंवर
आरवनूर
झेलम
बर्नाळा
मनावर
हमीरपूर-सिधर
जम्मू
उत्तर
पश्चिम
पूर्व
गुजरात
नवानशहर
संबा
सियालकोट

: काश्मीर-दर्शन :



वृत्तव्यवसायांतील माझे गुरु

श्री. कृ. ग. उर्फ

काकासाहेब लिमये

( माजी संपादक, ज्ञानप्रकाश )

यांस

सादर समर्पण.

लेखक.

शेर-इ-काश्मीर



शेख महम्मद अवदुला

म. ग्र. स. ठाणें.

# काश्मीरचें रणकंदन

— १ —

काश्मीर म्हणजे हिंदुस्थानचें नंदनवन,—पण सृष्टिसौंदर्यानें ओथंबलेल्या या रमणीय प्रदेशांत गेले तीन महिने पाकिस्तानी आक्रमकांनीं धुमाकूळ घालून जी धूळधाण केली आहे त्याला एखाद्या उन्मत्त मतंगजानें उद्ध्वस्त केलेल्या कमलवनाचीच उपमा द्यावी लागेल.

काश्मीर हिंदुस्थानांतील एक पहिल्या प्रतीचें मोठें संस्थान आहे. काश्मीर असें सामान्यपणें ज्या संस्थानाला आपण म्हणतों त्याचें खरें व सार्थ नामाभिधान 'जम्मू व काश्मीर संस्थान' असें आहे.

हिंदुस्थानच्या वायव्येस अतिटोंकाला या संस्थानचा मुलूख पसरलेला आहे. हिमालयाच्या पर्वतराजींतील बर्फाच्छादित शिखरें आणि दऱ्याखोरें या संस्थानांत विखुरलीं आहेत.

या संस्थानच्या दक्षिणेस हिंदुस्थानची हद्द भिडली आहे; पश्चिमेस पाकिस्तान आहे; वायव्येस अफगाणिस्तान आहे आणि उत्तर व पूर्व या दिशांस अनुक्रमें चीन व तिबेट आहेत. उत्तरेकडे सोव्हि-एट रशियाची हद्दही या संस्थानालगतच आहे.

मध्य-आशियाकडे जाणारे हिंदुस्थानचे व्यापारी मार्ग काश्मीर-

च्याच मुलुखांतून जातात. आंतरराष्ट्रीय सरहद्दींशीं सांनिध्य लाभल्यामुळें साहजिकच काश्मीरला एक अलौकिक भौगोलिक महत्त्व प्राप्त झालें आहे.

जम्मू आणि काश्मीर असे दोन प्रांत या काश्मीर संस्थानांत राज्यकारभारासाठीं समाविष्ट आहेत. त्याखेरीज उत्तरेस गिलगित व पूर्वेकडे बाल्टिस्तान व लडाख हे सरहद्द-प्रदेशही या संस्थानांतच मोडतात. हिमालयाचें नंगा पर्वत हें प्रसिद्ध शिखर गिलगित भागांत आहे.

संस्थानचें क्षेत्रफळ ८४,४७१ चौरस मैल असून लोकसंख्या चाळीस लाखांवर आहे. गिलगित, बाल्टिस्तान व लडाख विभागांतील लोकवस्ती तुरळक आहे. जम्मू व काश्मीर विभागांतच बहुसंख्य लोकवस्ती आहे.

काश्मीरची पंचाहत्तर टक्के प्रजा धर्मानें मुसलमान आहे. पण खुद्द काश्मीरांत— म्हणजे काश्मीरच्या खोऱ्यांत हिंदु—मुसलमान असा भेदच आढळत नाहीं. त्यांचा पोषाख सारखाच असतो. तेथल्या कोणाही हिंदूला किंवा मुसलमानाला ‘ तूं हिंदु कीं मुसलमान ? ’ असें विचारा; तो उत्तर देईल “ मी काश्मिरी आहें. ” जातीय दुहीचें विषारी बीज पेरण्याचे प्रयत्न काश्मिरांत झाले नाहींत असा याचा अर्थ नव्हे, पण त्या बीजानें तेथें मूळ असें केव्हांच धरलें नाहीं.

काश्मिरी पंडित हा बुद्धिमान् ब्राह्मणवर्ग या काश्मीर खोऱ्यांतच आहे. पं. नेहरू, डॉ. सर तेजबहाद्दूर सप्रू हे काश्मिरी ब्राह्मणच होत. जम्मू विभागांतील जम्मू, कठुआ, उधमपूर या जिल्ह्यांत शूर डोग्रा रजपुतांचें प्राबल्य आहे. पाकिस्तान प्रदेशालगत असलेल्या मुझफराबाद, पूंच व मीरपूर या जिल्ह्यांत मुसलमान बहुसंख्य आहेत.

कडव्या लढवय्या मुसलमानांचा प्रदेश म्हणून पूंच जहागीर प्रसिद्ध आहे. रिक्रूटभरतींत या जिल्ह्याचा सर्व हिंदुस्थानांत पहिला नंबर लागेल असें म्हणतात. गेल्या महायुद्धांत या जिल्ह्यानें ८०,००० रिक्रूट पुरविले व आज या जिल्ह्यांत किमान ५०,००० तरी सेवानिवृत्त वा सेवामुक्त लष्करी सैनिक असावेत असा अंदाज आहे. काश्मीरवरील आक्रमकांना यांतील बहुसंख्य मुसलमानांचें बरेंच साहाय्य मिळत असलें पाहिजे.

गिलगित व बाल्टिस्तान यांत मुसलमानच बहुसंख्य आहेत. लडाखमध्यें बरेच बौद्धधर्मानुयायी आहेत.

सर्व हवामानांनीं युक्त असा हा काश्मीरचा प्रदेश आहे. समुद्र-सपाटीपासून ५०० ते ८०० फूट उंचीच्या जम्मू प्रांतांतील सपाट प्रदेशापासून तों ५००० फूट उंचीवरील श्रीनगर, ७००० फूट उंचीवरील गुलमर्ग आणि ९००० फूट उंचीवरील बनिहाल पास व त्याहीपेक्षां उंचीवरील गिलगित व लडाख विभागांतील प्रदेश या संस्थानांत मोडतात. जम्मू ही संस्थानची हिंवाळी राजधानी आहे. उन्हाळ्यांत श्रीनगर हें राजधानीचें ठाणें आहे.

फळांफुलांनीं डंवरलेला असा हा प्रदेश आहे. काश्मिरी सफरचंदें प्रसिद्ध आहेत. सुका मेवा—बदाम व अक्रोड—हेंही तेथील वैशिष्ट्य आहे. हस्तकला व कौशल्य यांसाठीं काश्मीर ख्यात आहे. तेथील ' शाली ' तांदूळ सर्वोत्कृष्ट मानला जातो. अनुपम सृष्टिसौंदर्याची काश्मीर ही खाणच आहे.

काश्मीरचा सर्व प्रदेश डोंगराळ व खडकाळ असल्यामुळें रस्ते कठीण व थोडे आहेत. सियालकोटहून जम्मूपर्यंत चोवीस मैल रेल्वे आहे. पण पंधरा ऑगस्टपासून ती जवळ जवळ बंदच आहे. जम्मू-

श्रीनगर दोनशें मैल लांबीची पक्की डांबरी सडक आहे. बनिहाल पास ओलांडून ही सडक काश्मीरच्या खोऱ्यांत उतरते व ती पुढें श्रीनगरला जाते. श्रीनगरला जाण्याचा दुसरा मार्ग म्हणजे रावळपिंडीहून कोहाला रस्त्यानें दोमेल, उरी, बारामुला या मार्गे. याच रस्त्यानें आक्रमकांनीं प्रथम चढाई केली.

मोटर व बस हेंच या भागांतील वाहातुकीचें प्रधान साधन होय. बैल व बैलगाड्या येथें आढळत नाहींत. उंट, घोडे व खेंचरें यांचाही वाहातुकीच्या कामीं उपयोग केला जातो. पादचाऱ्यांची संख्या साहजिकच मोठी असते.

काश्मिरी लोक उंच बांध्याचे, सशक्त व हाडानें मजबूत आहेत. गौरवर्ण व गुलाबी गाल ही त्यांची निसर्गदत्त देणगी आहे. अगदीं लक्तरांत असलेलें शेंबडें चिमुरडेंदेखील गोरेंपान, गुबगुबीत, गुलाबी आणि हंसतमुख आढळेल.

पीर पंजाल पर्वतश्रेणीच्या उत्तरेस काश्मीरचें खोरें पसरलें असून या खोऱ्यांतच श्रीनगर शहर वसलें आहे. झेलम नदीच्या दोन्ही काठांस गांव वसलें असून शहराचे हे दोन भाग जोडणारे सात पूल शहरांत आहेत. या जलमार्गानें सर्व शहराचीही सफर करतां येते. श्रीनगरला पूर्वेकडील व्हेनिस म्हणतात तें याचमुळें.

काश्मीरचें खोरें पश्चिमेस सुमारें तीस मैल बारामुलापर्यंत पसरलें आहे. त्याच्या पश्चिमेस मुझफराबाद जिल्हा लागतो. मुझफराबादच्या दक्षिणेस पूंच, मीरपूर, रियासी व आखनूर हे जिल्हे आहेत. हा सर्व भाग आतां पाकिस्तानांत सामील झालेल्या पश्चिम पंजाबशीं नजीक आहे.

— २ —

पंधरा ऑगस्ट १९४७ ला हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्ता लोप पावली व हिंदुस्थान आणि पाकिस्तान या दोन स्वतंत्र स्वायत्त वसाहतराज्यांचा जन्म झाला. तारीख तीन जून सन एकोणीसशें सत्तेचाळीसची म्हणून जी प्रसिद्ध ब्रिटिश सत्तांतरयोजना झाली, त्यानुसार हें सर्व घडलें. तीन जूनच्या या योजनेनुसार पंधरा ऑगस्ट रोजीं संस्थानिकांवरील ब्रिटिश राजसत्तेचें प्रभुत्व नामशेष झालें व कोणत्याही—हिंदुस्थान व पाकिस्तान—वसाहतीला सामील होण्याचें स्वातंत्र्य संस्थानांना मिळालें. हिंदुस्थानांतील सहाशें संस्थानांपैकीं बहुतेकांनीं पंधरा ऑगस्टपूर्वींच कोणास सामील व्हावयाचें याचा निर्णय केला होता.

हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीं जीं कांहीं थोडीं संस्थानें या बाबतींत अनिर्णित होतीं त्यांत काश्मीर हें एक प्रमुख संस्थान होतें. हिंदु राजा व बहुसंख्य मुसलमान प्रजा हें त्याचें एक कारण असावें. पण त्याहीखेरीज पंचाईत म्हणजे काश्मीरचे हिंदुस्थानशीं लागेबांधे पुरातन आणि बळकट पण हिंदुस्थानची सरहद्द लागलेली फार थोडी; उलट पाकिस्तानची सरहद्द शेकडों मैलांची आणि मुख्य वहातुकीचे मार्ग आणि उपलब्ध दळणवळणाचीं साधनें पाकिस्तान प्रदेशांतूनच ! त्यामुळें पाकिस्तान-हिंदुस्थान यांत कोणास सामील व्हावयाचें हा काश्मीरपुढें नाजूक प्रश्न उभा होता.

सामीलनाम्याच्या प्रश्नाबाबत नीट विचारपूर्वक निर्णय घेण्यास अवसर मिळावा यासाठीं काश्मीरनें प्रथम पाकिस्तानशीं ‘ जैसे थे ’ करार केला. रेल्वे, रस्ते, पोस्ट, तारा हें सर्व काश्मीरचें दळणवळण

पाकिस्तानांतूनच होतें, व या 'जैसे थे' कराराचा अर्थच असा होता कीं सामील होण्याच्या प्रश्नाचा अखेर निर्णय काश्मीर करीपर्यंत पाकिस्तान-काश्मीर यांचे संबंध पंधरा ऑगस्टपूर्वी जसे होते तसेच बरोबर रहावयाचे.

भारतविच्छेदनाच्या या योजनेच्या पूर्वीच्या काळांत पंडित रामचंद्र काक या काश्मीरच्या पन्तप्रधानाच्या हातीं संस्थानचीं सर्व राज्यसूत्रें होतीं. या काळांत संस्थानिक, व्हाइसरॉय व हिन्दी लोकनेते यांच्यांत ज्या महत्त्वाच्या वाटाघाटी झाल्या त्यांत काश्मीरतर्फे पंडित रामचंद्र काक यांनींच भाग घेतला व त्या वेळीं सदैव त्यांनीं नरेन्द्र-मण्डळाचे अध्यक्ष भोपाळचे नबाबसाहेब आणि सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांचीच री ओढली.

खुद्द काश्मीरच्या अन्तर्गत राज्यव्यवस्थेंत पं. काक यांनीं चांगलेंच दडपशाहीचें धोरण स्वीकारलें होतें. काश्मीरच्या पन्तप्रधानपदावर चढलेला पहिलाच काश्मिरी नागरिक म्हणून त्यांच्या कारभाराकडे काश्मीरची जनता मोठ्या आशेनें पहात होती. पण संस्थानची जी प्रमुख लोकसंघटना 'अखिल जम्मू व काश्मीर राष्ट्रीय परिषद्' तिची मुस्कटदाबी करून आणि शेख अबदुल्ला आणि तिचे इतर नेते यांना तुरुंगाचे दरवाजे दाखवून पं. काक यांनीं लोकमताची पुरी मुस्कटदाबी केली. काश्मिरांत मुस्लिम परिषद् नांवाची दुसरी एक राजकीय संघटना त्या वेळीं होती. भारतीय मुस्लिम लीग या संस्थेच्या पाठीमागें होती. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं शेख अबदुल्लांच्या राष्ट्रीय परिषदेची पद्धतशीर गळचेपी होत असलेल्या पं. काक यांच्या राज्यांत या मुस्लिम परिषदेच्या कारवाया मात्र अनिर्बंध चालू राहिल्या होत्या.

काश्मीरच्या संस्थानी नोकरशाहींत राजा हिंदु म्हणून हिंदूंचें व विशेषतः काश्मिरी पण्डितांचें प्राबल्य होतें आणि संस्थानी सैन्यांत डोग्रा रजपुतांचा भरणा मोठा होता. साहजिकच संस्थानची बहुसंख्य मुसलमान प्रजा असंतुष्ट होती. जातीयतेच्या भूमिकेवरून हा असंतोष तीव्र करण्याचें काम मुस्लिम परिषद् करीत होती.

काश्मीरची राष्ट्रीय परिषद् ही संस्था जातिभेदावर आधारलेली नव्हती. तिच्या अनुयायांत हिंदु, मुसलमान, शीख सर्व होते. राजकारणांत लोकशाहीचा पुरस्कार आणि सामाजिक आणि आर्थिक विषमतेचें उच्चाटण हें या संस्थेचें ध्येय असल्यानें खालच्या पददलित वर्गांत तिचें चांगलेंच वजन होतें आणि तिला अनुयायित्वही भरपूर होतें. पं. काक यांनीं राष्ट्रीय परिषदेची धास्ती घेतली होती याचें कारण हेंच !

पाकिस्तानची प्रतिष्ठापना निश्चित होतांच काश्मीर संस्थान पाकिस्तानला सामील कसें होईल याचीच चिंता पाकिस्तानपुरस्कर्त्यांना लागून रहावी यांत नवल तें काय? काश्मीरचें राजघराणें हिंदु; सध्याचे अधिपति महाराजाधिराज सर हरिसिंग हे डोग्रा रजपूत. दुसऱ्या महायुद्धांत संयुक्त युद्धमंडळाचे ते एक सभासद होते. संस्थानचा राजा हिंदु, तर प्रजा बहुसंख्य मुसलमान; त्यांतच अप्रिय हिंदु नोकरशाही आणि डोग्रा सैन्य यांबद्दलचा असंतोष. या परिस्थितीचा फायदा घेण्याचें पाकिस्तान-पुरस्कर्त्यांनीं ठरविलें. जें साम व दाम यांनीं साध्य होणें शक्य नव्हतें तें दंड व भेद यांच्या जोरावर हस्तगत करण्याचा त्यांनीं चंग बांधला. भौगोलिक दृष्ट्या आंतरराष्ट्रीय महत्त्वाचा आणि सुपीक, समृद्ध असा हा प्रदेश पाकिस्तानशीं संलग्न व्हावा अशी इच्छा त्यांनीं उराशीं बाळगली.

काश्मीरवर सशस्त्र आक्रमण करून, दंगेधोपे दंगल माजवून, बळजबरीनें काश्मीरला पाकिस्तानास मिळणें भाग पाडावयाचें याच कल्पनेंतून काश्मीरवरच्या चालू आक्रमणाचा जन्म झाला.

काश्मीरचें प्रत्यक्ष आक्रमण जरी पंधरा ऑगस्टच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झालें तरी त्याचें राजकारण बराच काळ आधीं शिजत होतें. हवापालटाच्या निमित्तानें पाकिस्तानप्रेमी ब्रिटिश अधिकारी (जुन्या जमान्यांतले) व पाकिस्तानचे प्रकट व प्रच्छन्न प्रचारक काश्मीरांत जाऊन किल्मिष फैलावीत होते, असंतोष चेतवीत होते, आणि त्यांच्या इतरही पंचमस्तंभीय कारवाया चालू होत्या याबद्दलचा पुरावा उपलब्ध आहे. एरव्हीं काश्मीरच्या भूमीपासून शेंकडों मैल दूर असलेल्या सरहद्दीवरील पठाण व टोळीवाल्यांना काश्मिरी मुसलमानांबद्दल एकाएकीं बंधुप्रेमाचा (!) पान्हा फुटतो याचें रहस्य काय?

— ३ —

काश्मीरच्या पंतप्रधानपदावरून पं. रामचंद्र काक यांची उचलबांगडी झाली तेव्हां काश्मीर पाकिस्तानपासून दूर चाललें. याची पहिली खूण पाकिस्तान-पुरस्कर्त्यांना पटली. पंधरा ऑगस्टचा दिवस उगवला, पाकिस्तान अस्तित्वांत आलें व तो दिवस मावळला. पण काश्मीर पाकिस्तानला मिळण्याची भाषाच काढीना. तेव्हां आतां दंडेलीनेंच हें काम केलें पाहिजे अशी काश्मीरच्या हितशत्रूंनीं आपल्या मनाशीं खूणगांठ बांधली.

जबरदस्ती हें धोरण एकदां ठरल्यावर मग काय, चक्रें भराभर फिरूं लागलीं. काश्मीरचें तार, टेलिफोन, रेल्वे, रस्ते वगैरे सर्व

दळणवळण पाकिस्तानमधून होतें, त्यांत पद्धतशीर अडथळे आणि व्यत्यय येऊं लागले. अन्न, वस्त्र, मीठ, साखर, पेट्रोल, इत्यादि नित्योपयोगी आणि आवश्यक वस्तूंचा पुरवठा याच मार्गे होई; त्यांत अक्षम्य हेळसांड व दिरंगाई होऊं लागली. वास्तविक काश्मीर-पाकिस्तान 'जैसे थे' करार झाला असतांना या गोष्टी व्हावयास नको होत्या. पण घरच फिरलें होतें! काश्मीरनें राज-नैतिक तक्रार-निषेध केला. पण पुसतो कोण? काश्मीरची 'आर्थिक कोंडी' करून राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याचा पद्धतशीर असाच तो डाव होता.

आर्थिक कोंडीच्या या गळचेपीखालीं काश्मीर गुदमरत असतांच ऑक्टोबर ( १९४७ ) महिन्यांत सरहद्द प्रांतांतील पठाण व टोळीवाले यांच्या सशस्त्र संघटित जमावानें काश्मीर-पाकिस्तान सरहद्दीलगत असलेल्या काश्मीरहद्दींतील मुझफराबाद या शहरावर हल्ला चढविला. रावळपिंडी-कोहाला-श्रीनगर रस्त्यावर हें शहर असून त्या नांवाच्या जिल्ह्याचें तें मुख्य ठाणें होतें. काश्मीरचें युद्ध असा ज्याचा सार्थ उल्लेख करतां येईल त्या काश्मीरच्या विद्यमान युद्धाची नांदी अशा रीतीनें म्हटली गेली.

मुझफराबादवर हा हल्ला होण्यापूर्वीं काश्मीरांत सर्वत्र शांत सामसूम होतें असा याचा अर्थ नव्हे. पंजाबच्या भीषण हत्या-कांडाचे ध्वनि-प्रतिध्वनि लगतच्या काश्मिरी संस्थानी टापूंत उमटले होते. संस्थानी मुलुखांतील खेडीं लुटून भस्मसात् केलीं जात होतीं; निरपराध माणसें, बायका व मुलें यांची कत्तल होत होती; मशिदी-देवालयें उद्ध्वस्त केलीं जात होतीं; स्त्रियांचें अपहरण आणि

बळजबरीचें धर्मांतर चालू होतें. शेजारच्या पाकिस्तान मुलखांतील पंजाबी मुसलमान आणि सरहद्द प्रांतांतील पठाण आणि टोळीवाले हेच हे अत्याचार करणारांत प्रमुख होते.

टाळी एका हातानें वाजत नाहीं या न्यायानें कांहीं ठिकाणीं हिंदूंनींही अत्याचार केले. विशेषत: जम्मू भागांत पंजाबांतून काश्मीरांत शिरलेले शीख निर्वासित आणि स्थानिक डोग्रा रजपूत यांनीं स्थानिक मुसलमानांवर त्यांच्या भाईबंदांच्या अपकृत्यांबद्दल 'सूड' घेतला. अनेक मुसलमान घरांदारांसच नव्हे तर प्राणांसही मुकले. त्यांची वित्तहानीही बरीच झाली. तथापि एक गोष्ट निश्चित; ती ही कीं या सर्व प्रकारांना जातीय दंगलीचें स्वरूप होतें. काश्मीरच्या युद्धाला प्रत्यक्ष प्रारंभ झाला तो वर उल्लेखिलेल्या मुझफराबादवरील हल्ल्यानेंच.

मुझफराबादवरील हा हल्ला अत्यंत व्यवस्थित रीतीनें योजण्यांत आला होता. आक्रमक सर्व आधुनिक युद्धसामग्रीनें सज्ज होते. या ठिकाणीं काश्मीरच्या संस्थानी फौजेची एक तुकडी होती. त्यांपैकीं जमादार बिशनसिंग हा मला भेटला. मुझफराबादजवळ रामकोट व लोहारगली या दोन जागा आहेत. या दोन्ही जागीं संस्थानी लष्कराचीं नाकीं होतीं. हीं नाकीं इतक्या मोक्याचीं आहेत कीं चाळीस लोकांची एक तुकडी देखील मनांत आणील तर या नाक्यावर ७००–८०० सैन्याच्या तुकडीला तोंड देऊन त्यांना परतवून लावील. मुझफराबादवरील हल्ल्याच्या वेळीं या राम-कोट आणि लोहारगली ठाण्यांवर काश्मीर फौजेंतील दोन मुसलमान तुकड्या होत्या. बिशनसिंग शहरांतील ठाण्यावर होता. एका भल्या पहाटे ज्या वेळीं आक्रमकांनीं शहरच्या लष्करी छावणीवर

मोर्चे लावून बंदुका व मशीनगन्स यांचा भडिमार केला तेव्हां रात्रीच्या प्रशान्त वेळीं रामकोट व व लोहारगली हीं ठाणीं त्यांनीं पार केलीं असलीं पाहिजेत हें उघड झालें. संस्थानच्या मुसलमान तुकड्यांनीं त्यांना कितपत प्रतिकार केला याबद्दल बिशनसिंगला-देखील कोडेंच पडलें असें दिसलें.

पाकिस्तान मुलुखांतून मोटरींवर मोटरी भरून शत्रूला मदत येऊन पोचल्याचें आपण पाहिलें असेंहि जमादार बिशनसिंग यानें मला सांगितलें. या शूर शिपायानें आपल्या एका मशीनगननें शत्रूशीं सामना दिला. पण शत्रूची संख्या येवढी मोठी होती कीं त्याचें त्यापुढें काय चालणार? अनेक सोबती मारले गेले; शहरांत घुसून शत्रूनें जाळपोळ, लूटमार आणि कत्तल आरंभली व अखेर आपला निभाव लागणें शक्य नाहीं असें दिसतांच दोन मशीनगन्स व दारूगोळ्याच्या चौदा पेट्या यांसह जमादार बिशनसिंग व त्याचे मूठभर सोबती यांनीं माघार घेतली.

एकंदर पारडें पालटलेलें पाहून या लोकांनीं हमरस्ता सोडून डोंगराळ मुलुखांतून वाटचाल सुरू केली. वाटेंत त्यांना मदत मिळणें-ही मुष्कील झालें. शत्रू सपासप अंतर कापीत उरी-बारामुलाच्या रोखानें दौडत होता. संस्थानी सैन्य, पोलीस व मुलकी अधिकारी क्वचित् प्रतिकार करून देह ठेवीत किंवा स्थलत्याग करीत.

कोठेंतरी संस्थानी सैन्याच्या ठाण्याची आपणांस मदत मिळेल अशा आशेवर बिशनसिंग व त्याचे सोबती कडेपठारांवरून आणि डोंगरदऱ्यांतून पायवाटेनें मार्गेमार्गें जात होते. दोन ठिकाणीं त्यांच्या प्राणांवर बेतलें; पण मशीनगन्स आणि दारूगोळा यांच्या-मुळें ते बचले. अफगाणिस्तानचे पदच्युत राजे अमानुल्ला काश्मिरी

मुसलमानांच्या विमोचनासाठीं आले आहेत, तुम्ही त्यांना सामील व्हा, असा सल्ला एका जमावानें त्यांना दिला, कारण आपण मुसलमान असल्याची बतावणी त्यांनीं तेथें केली होती.


ना अन्न, ना पाणी, ना ऊब, ना निवारा अशा हालअपेष्टांत निर्जन अरण्यांतून रात्रंदिवस प्रवास करून मुझफराबाद सोडल्यापासून सहाव्या दिवशीं हे लोक श्रीनगर-गिलगित रस्त्यावरील बंदीपूर या गांवीं पोचलें व पहिला सुटकेचा निःश्वास त्यांनीं टाकला.

— ४ —

आक्रमकांना रसद व इतर कुमक मिळत होती. त्यांची संख्याही वाढत होती. मुझफराबाद काबीज केल्यावर त्यांनीं मुख्य कोहाला-श्रीनगर रस्त्यानें भराभर चाल सुरू केली. दोमेल पडलें. झेलम व कृष्णगंगा या दोन नद्यांचा मेळ—संगम—येथें झाला आहे म्हणून गांवाचें नांव दो-मेल पडलें. गढी सर झाली.

उरी येथें काश्मीर सैन्याच्या एका तुकडीनें ब्रिगेडियर राजेन्द्रसिंग यांच्या नेतृत्वाखालीं आक्रमकांशीं निकराचा सामना दिला. पण शंभर-सवाशें सैनिक हजारों आक्रमकांपुढें किती काळ टिकाव धरणार? 'लढेंगे या मरेंगे' या निर्धारानें या छोट्या तुकडीनें शिकस्त केली. ब्रिगेडियर राजेन्द्रसिंग मारले गेले. त्यांच्या तुकडींतील एकूणएक सैनिक कामास आला व मगच उरींत शत्रूचा पाय रुतला.

ब्रिगेडियर राजेन्द्रसिंग यांच्या या छोट्या तुकडीची 'हाराकिरी' महत्त्वाची ठरली. ईदचा सण श्रीनगर काबीज करुन तेथें साजरा करावयाचा असा आक्रमकांचा मनोदय होता. त्यांचें हें स्वप्न विर-



-मोडका पूल व झुलता तराफा; जम्मू प्रांतात दोन डोंगरांच्या खोल दरीतून हिंदी सैन्याला कुमक पोचते ती अशा अडचणींतून.



हिंदुस्थानचे उपपंतप्रधान सरदार पटेल व शेख अबदुल्ला
विचार विनीमय करीत आहेत.

ण्यास उरीची ती लढाई उपकारी ठरली. उरी येथें आक्रमकांना विरोध होऊन त्यांचा कालापव्यय झाला त्यांतच श्रीनगरच्या सुटकेचें बीज होतें. नाहीं तर हिंदी सैन्य काश्मीरच्या रणांगणावर उतरण्या-पूर्वींच आक्रमक श्रीनगरांत घुसले असते. आणि एकदां का श्रीनगरच्या विमानतळावर त्यांचा कबजा बसला असता म्हणजे हिंदी सैन्य काश्मीरांत उतरणेंदेखील मुष्कील झालें असतें.

उरीनंतर आक्रमकांनीं बारामुला सर केलें. आक्रमकांनीं येथें अत्याचार केले त्याच्या पाशवीपणाला सीमाच नाहीं. राष्ट्रीय परिषदेचे एक निस्सीम मुसलमान कार्यकर्ते श्री. शेरवानी यांना आक्रमकांनीं भर चौकांत दोन लांकडी खांबांना बांधून त्यांचा अमानुष वध केला. त्यांच्या शरीरावर चौदा गोळ्यांच्या खुणा होत्या. सेंट जोसेफ कॉन्व्हेंट या खिस्ती धर्मसंस्थेंतील वृद्ध खिस्ती जोगिणींवर देखील आक्रमकांनीं तरवारी चालविल्या. हें इस्लामचें धर्मयुद्ध !

श्रीनगरच्या खोऱ्याच्या तोंडाशीं बारामुला गांव वसलें आहे. शहराच्या मधून झेलम नदी वाहते. दोन्ही बाजूंस उंच डोंगर आहेत. देखावा फारच रम्य आहे. पण आक्रमकांनीं या सुंदर शहराला प्रेतकळा आणून सोडली आहे. शहराच्या दुसऱ्या बाजूस नदीपलीकडे एक सुंदर देवालय होतें. राम, सीता, लक्ष्मण व हनु-मान यांच्या सुंदर संगमरवरी मूर्ती होत्या. या मूर्तींचा त्या पाखांडी विध्वंसकांनीं नुसता 'सोमनाथ' करून सोडला. मंदिर तर उद्ध्वस्त केलेंच, पण मूर्तींचाही चुराडा केला.

बारामुला म्हणजे श्रीनगरची वेसच. तें काबीज करून शत्रू श्रीनगरचें दार ठोठावूं लागला तेव्हां काश्मीरच्या महाराजांनीं हिंदुस्थानकडे मदतीची याचना केली व काश्मीर हिंदी संघराज्यास

सामील करून घ्यावें अशी विनंति केली. राष्ट्रीय परिषदेचे नेते शेख अबदुल्ला यांनींही या विनंतीस दुजोरा दिला.

वेळ आणीबाणीची होती. प्रत्येक क्षण मोलाचा होता. हिंदी संघराज्यापुढें पडलेला प्रश्न सोपा नव्हता. ऑक्टोबर २५-२६ च्या रात्रीं हिंदुस्थानचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू आजारी होते. त्यांच्या रुग्णशय्येभोंवतीं मंत्रिमंडळाची बैठक भरून सर्व प्रश्नांचा सांगोपांग विचार झाला व काश्मीरची विनंति मान्य करण्याचें ठरलें.

हिंदी लोकप्रतिनिधिसभेपुढें केलेल्या निवेदनांत पं. नेहरू यांनीं या परिस्थितीचें अत्यंत मार्मिक विवेचन केलें. पं. नेहरू म्हणाले—

"हा निर्णय घेण्याला आम्हीं चोवीस तासांचा देखील विलंब लावला असता तर श्रीनगर पडलें असतें आणि मुझफराबाद, बारामुला या व इतर शहरांवर जी घोर आपत्ति कोसळली तीच श्रीनगरलाहि भोगावी लागली असती हें आतां स्पष्ट आहे. अमानुष आणि बेजबाबदार आक्रमकांकडून काश्मीरचा असा होणारा सत्यानाश स्वस्थ बसून पहाणें शक्य नव्हतें. कारण त्याचा अर्थ धाकदपटशा आणि आत्यंतिक धर्मवेडेपणा यांना शरणचिठ्ठी लिहून देणें असाच झाला असता व अखिल हिंदुस्थानवर त्याचे गंभीर परिणाम झाले असते. काश्मीर व आक्रमक यांमधील लढ्यांत त्या क्षणीं पदार्पण करणें सोपें नव्हतें. त्यांत धोके होते आणि भयही होतें. पण ते धोके पत्करण्याचें आणि काश्मीरच्या लढ्यांत उतरण्याचें आम्हीं ठरविलें, कारण आम्हीं तसें केलें नसतें तर काश्मीरचा सत्यानाश होऊन हिंदुस्थानला मोठाच धोका उत्पन्न झाला असता."

हिंदी सरकारच्या या निर्णयानुसार हिंदी सैन्याची पहिली तुकडी ऑक्टोबरच्या २७ तारखेला श्रीनगरच्या विमानतळावर

उतरली. त्या वेळीं शत्रु बारामुला येथें पोहोंचला होता. या तुकडीचे सेनानी ले. क. डी. आर. राय हे होते. शत्रु पुढें सरकण्यापूर्वीच त्याच्याशीं सामना देण्याचें त्यांनीं ठरविलें व एका छोट्या तुकडी-निशीं आपल्यापेक्षां अधिक संख्येच्या शत्रूशीं सामना दिला. ले. क. राय हे या चकमकींत धारातीर्थीं पडले. पण त्यांचें प्राणार्पण व्यर्थ ठरलें नाहीं. हिंदुस्थानहून अधिक कुमक येईपर्यंत शत्रूचें पाऊल रोखलें गेलें आणि श्रीनगरचें जीवदान निश्चित झालें.

अर्थात् भरपूर कुमक उपलब्ध होईपर्यंत हिंदी सैन्याला शत्रू-विरुद्ध चढाई सुरू करतां आली नाहीं. आणि जी काय कुमक यावयाची ती सर्व विमानमार्गें. त्यामुळें साहजिकच ती कुमक येऊन चढाई करण्यास एक आठवडा लागला. दरम्यान बारामुलानंतर पट्टण पादाक्रांत करून शत्रु जवळ जवळ श्रीनगरच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला. श्रीनगरच्या विमानतळाचा ताबा घेण्याचाही शत्रूनें एक प्रयत्न केला; पण हिंदी सैन्यानें त्याची तेथें चांगलीच रग जिरवली.

अखेर पुरेसें सैन्य व युद्धसामग्री उपलब्ध होतांच हिंदी सैन्यानें शत्रूवर जोराचा हल्ला चढविला. बारा तास तुंबळ युद्ध झालें व अखेर शत्रूनें पळ काढला. शत्रुपक्षाचे शेकडों सैनिक ठार झाले. काश्मीरच्या लढाईचें पारडें या चकमकीनें फिरवलें.

एक दोन दिवसांतच हिंदी सैन्यानें पट्टण व बारामुला काबीज केलीं. पळ काढतां काढतां शत्रूनें माहोरा येथील विद्युत्केंद्र उद्ध्वस्त केलें व त्यामुळें श्रीनगरचा विद्युत्पुरवठा बंद पडला. त्याहीपुढें जाऊन आणखी कांहीं दिवसांत हिंदी सैन्यानें शत्रूला उरीमागें रेटलें.

— ५ —

एकीकडे उरी-बारामुला विभागांत शत्रु मार खात होता, तर त्यापूर्वीच आक्रमकांनीं जम्मू प्रांताकडे आपला मोर्चा वळविला होता. सियालकोट, गुजरात, झेलम व रावळपिंडी या पाकिस्तानी जिल्ह्यांतून पूंच आणि मीरपूर या मुसलमान बहुसंख्य विभागावर हल्ले चढविण्यांत आले होते. सेवामुक्त लष्करी मुसलमान सैनिकांनीं भरलेल्या पूंचमध्यें तर आक्रमकांना मोकळें रानच मिळालें. "आझाद काश्मीर फौज" हें नामाभिधान धारण करणाऱ्या शत्रुसेनेचें मुख्य ठाणें जें पलंदरी तें याच जिल्ह्यांत पाकिस्तान सरहद्दीलगत आहे.

मीरपूर जिल्ह्यांतही शत्रु मोठ्या प्रमाणावर घुसला होता. भिंबर, रजोरी, नौशेरा हीं ठाणीं पडलीं होतीं. नौशेरांतील काश्मिरी सैन्य वेढापार झालें होतें. कोटली, पूंच व मीरपूर येथील संस्थानी सैन्यानें शत्रूच्या वेढ्याला बराच काल दाद दिली नाहीं. अखेर त्यांना हिंदी सैन्यानें सोडविलें. सदतीस दिवस वेढलें गेल्यानंतर मीरपूर येथील संस्थानी सैन्य हतबल होऊन बाहेर पडलें व मोठ्या शिकस्तीनें आपल्याबरोबर १०.००० नागरिकही त्यांनीं वांचवून आणले.

याच विभागांत सध्यां शत्रूच्या हालचालींना जोर असून हिंदी सैन्यही त्यांना सामना देत आहे. पूंच शहरांतील संस्थानी सैन्य हिंदी सैन्यानें वेढा-मुक्त केलें असून पूंच शहर हिंदी सैन्याच्या हातीं आहे. कोटलीचा वेढा हिंदी सैन्यानें उठविला व तेथील नागरिकांची सुरक्षित स्थळीं रवानगी केली. त्यानंतर कोटली आपल्या सैन्यानें सोडलें. झांगरही नुकतेंच आमच्या सैन्याला सोडावें लागलें; पण त्याला विशेष महत्त्व देण्याचें कारण नाहीं.

शत्रूजवळ अद्ययावत् युद्धसामग्री आहे यांत शंका नाहीं. आक्रमक ३०३ रायफलींचा सर्रास उपयोग करतात. ‘ टक-डम ’ रायफलीही त्यांच्याजवळ आहेत. या बंदुकीच्या गोळ्यांचा ‘टक-डम’ असा आवाज होतो. जपानी लोक अशा बंदुका वापरीत आणि हिंदुस्थानांत विशेषत: सरहद्दीवर त्यांचा विशेष उपयोग केला जातो. रणगाड्यांवर चालवावयाच्या बंदुका त्यांच्याजवळ आहेत. स्टेन बंदुका, ब्रेन बंदुका, मध्यम आकाराच्या मशीनगन्स व दोन-इंची आणि तीन-इंची तोफगोळे शत्रु वापरतात. कोटलीवरील वेढ्यांत शत्रूनें तोफखाना चालविला.

युद्धक्षेत्राच्या आघाडीवरील एका ठाण्याला मीं भेट दिली तेव्हां सायंकाळच्या सुरवातीस शेजारच्या टेकडीवर दोन तोफगोळे थाड्-दिशीं आपटले. पाठोपाठ ‘ टक-डम ’ फैरी सुरू झाल्या व मशीन-गन्स चालल्याचे आवाजही कर्णपथावर आले. टेकडीपलीकडून शत्रूच्या या हालचाली सुरू होत्या. आमच्या सैन्यानें शत्रूच्या या हालचालींना त्याच भाषेत उत्तर दिलें. रात्रीच्या अंधारांत आमच्या हालचालींचें निरीक्षण करतां यावें म्हणून चंद्रज्योतीसारखा ‘ व्हेरे लाइट ’ शत्रूनें अस्मानांत सोडला.

शत्रूजवळ बिनतारी संदेशवाहक यंत्रें आहेत. गवताचीं छपरें असलेल्या मातीच्या घरांना दुरून आगी लावण्याकरितां शत्रू ‘ट्रेसर’ पद्धतीच्या बंदुकींच्या गोळ्यांचा उपयोग करतो

आक्रमकांनीं ही सर्व शस्त्रसामग्री कशी जमवली असेल हा प्रश्न महत्त्वाचा आहे. यांतील कित्येक शस्त्रास्त्रें अशीं आहेत कीं, संघटित सैन्याखेरीज तीं इतर कोणाजवळ मिळणेंच कठीण.

स्वत:स 'आझाद काश्मीर सरकार' म्हणविणाऱ्या 'नामक'-सरकार-जवळ येवढी शस्त्रसामग्री कोठून येणार ? साहजिकच अनुमान निघतें कीं, या आक्रमकांपाठीमागें एखादें संघटित व प्रस्थापित सरकार असलें पाहिजे. अर्थात् पहिलें नांव नजरेसमोर उभें राहतें तें पाकिस्तानचेंच !

पूंच-मीरपूर विभागांतील आमच्या सैन्याच्या हालचाली मुख्यत्वें एका गोष्टीवर अवलंबून आहेत, व ती गोष्ट म्हणजे आखनूर-नौशेरा भागांतून जाणारा जम्मू ते झांगर-कोटली रस्ता. या रस्त्यानें मीं प्रवास केला आहे. 'बर्मा रोड' याच्यापुढें कांहींच नव्हता अशी एका विदेशी पत्रकारबंधूनें मजपुढें कबुली दिली. काळीधार नांवाच्या पर्वतश्रेणींतून हा रस्ता जातो. काळीधार पर्वतराजी नांवा-प्रमाणेंच कभिन्न काळ्या खडकाची आणि एखाद्या हत्याराच्या पात्यासारखी तीक्ष्ण आहे. ही सडक पक्की डांबराची नाहीं. तिची निगाही शांततेच्या काळांत योग्य रीतीनें राखली गेली नाहीं. त्यामुळें रस्ता बराच नादुरुस्त आहे.

डोंगरदऱ्यांतून जाणारा या रस्त्याचा वीस मैलांचा भाग प्रेक्षणीय असला तरी तितकाच भयावहही आहे. डोंगराच्या कडेकडेनें नाग-मोडी वळणें घेत चढउतार करीत जाणाऱ्या या रस्त्यावर प्रवास करीत असतांना जीवन आणि मृत्यु यांच्यामध्यें तारेवर कसरत करीत असल्याचा प्रत्यय येतो. मोटरीचें चाक थोडें जरी एका बाजूस फिरलें किंवा अणुमात्र अंदाज चुकला तर शेंकडों फूट खोल दरींत आपटून कपाळमोक्ष होण्यास क्षणही लागणार नाहीं अशा जागा शेंकडोंनीं आहेत. आपल्याकडील बोरघाट, कात्रजचा घाट हे घाटरस्ते या रस्त्या-पुढें क:पदार्थ ! कांहीं वळणें तर अशीं आहेत कीं डोळेच 'फिरावे.'

सत्तर मैलांचा हा रस्ता तोडण्याला आम्हांला दहा तास पुरले नाहींत. पूंच-मीरपूर विभागांतील आमच्या सैन्याला रसद या रस्त्यानें जाते. ही रसद पोचून चढाईचें धोरण स्वीकारण्यास या भागांत कांहीं विलंब लागला असेल तर त्याचें कारण हा रस्ता !

— ६ —

काश्मीर आणि जम्मू विभागांत लढाईच्या ऐन धुमश्चक्रींत मीं तीन आठवडे घालविले. पट्टण, बारामुला येथें जाऊन आक्रमकांनीं केलेली नासधूस मीं पाहिली व स्थानिक जनतेकडून आक्रमकांच्या अत्याचारांची करुण कथा श्रवण केली. राष्ट्रीय परिषदेनें केलेल्या लोकजागृतीचें प्रात्यक्षिक श्रीनगरांत मला पहावयास मिळालें.

मीरपूर व कोटली येथें वेढलेले लोक सुटका झाल्यानंतर जम्मू-कडे हजारोंच्या संख्येनें येत असतां मीं पाहिले. जम्मूच्या नैऋत्येस अवघ्या अठरा मैलांवर जम्मू-सियालकोट रस्त्यावरील सुचेतगड कस्टम नाक्यावर काश्मीर-पाकिस्तान हद्दी भिडतात तें नाकें मीं पाहिलें व क्षणभर पाकिस्तानांत पदार्पण केल्याचेंही श्रेय पदरांत पाडून घेतलें. देव-बटाला या आखनूर जिल्ह्याच्या भागांतील खेड्यांना एकापाठोपाठ आगी लावल्या गेलेल्या चौक-चौरी या डोंगरकड्यावरून दुर्बिणीच्या साहाय्यानें मीं पाहिल्या.

जम्मू-काश्मीरच्या या वास्तव्यांत अनेक सरकारी, बिनसरकारी, लष्करी व मुलकी लोकांशीं निरनिराळ्या विषयांवर मीं चर्चा केली, अनेक गोष्टींचा आम्हीं ऊहापोह केला व अनेक नवीन गोष्टी मला ज्ञात झाल्या. काश्मीरचें विद्यमान सरकार आणि काश्मिरी जनता यांपुढें किती प्रश्न कोणकोणत्या स्वरूपांत उभे आहेत याची मला

चांगलीच कल्पना आली. काश्मीरपुढें आज उभ्या असलेल्या प्रश्नांत निर्वासितांच्या प्रश्नाला साहजिकच प्राधान्य दिलें पाहिजे.


मार्च १९४७ नंतर पंजाब व सरहद्द प्रांत यांत जातीय कलह जोरानें सुरू झाला. या हत्याकांडाचा इतिहास ताजाच आहे. या काळांत काश्मीरला लागून असलेल्या पंजाब व सरहद्द प्रांतांच्या भागांतील मुस्लिमेतरांनीं काश्मीरच्या भूमीचा आश्रय घेतला. काश्मीरचें रणकुंड पेटल्यापासून हे निर्वासित आतां शक्य तितक्या लवकर हिंदुस्थान कसा गांठावा या विवंचनेंत आहेत.

सशस्त्र आक्रमकांनीं काश्मीरवर चढाई केली व जसजसे आक्रमक श्रीनगरजवळजवळ सरकूं लागले तसें उरी-बारामुला-श्रीनगर या भागांतील मुसलमानेतरही घाबरून सुरक्षित जागीं जाण्यास धडपडूं लागले. काश्मीरसारख्या डोंगराळ मुलुखांत, रेल्वे नाहीं, मोटरी बंद पडलेल्या, अशा परिस्थितींत अशा हजारों शरणार्थींना एका ठिकाणाहून दुसरीकडे पोचविणें किती दुरापास्त असेल याची कल्पनाच केलेली बरी

विमानवाहतुक हें यावर कोणीही उत्तर देईल. वाहतुकीचें सर्वांत सोपें आणि अत्यंत द्रुतगतीचें असें हें साधन हें खरें. पण खर्चाची वाट काय ? काश्मीरच्या युद्धांत सुरवातीला सर्व सैन्यसामग्री हिंदुस्थान सरकारला विमानमार्गें श्रीनगरला रवाना करावी लागली. त्यालाच क्रोडों रुपये खर्च आला असेल. एक डाकोटा विमान श्रीनगरला खास कामासाठीं जाऊन यावयाचें म्हटलें तर सरकारला त्याचा खर्च ८००० रुपये येई असें म्हणतात. प्रारंभीं प्रारंभीं अशीं किमान ४० विमानें रोज जात येत व कित्येक तर दिवसांत दोन तीन खेपादेखील करीत.



‘ बचाव काश्मीर ’ फौजेंतील महिलांची आघाडी.



हिंदी सैन्याचे रणगाडे.

पुढें पुढें ही विमानवाहतुक रोडावली व थंडीच्या दिवसांत तीं जवळ जवळ नाहींच आहे. हीं विमानें मोकळीं परत येण्याऐवजीं त्यांतून शरणार्थींना आणलें जावें अशी व्यवस्था करण्यांत आली होती. पण असे विमानानें लोक पाठवणार तरी किती ? आकाश फाटल्यावर त्याला ठिगळें किती पुरणार ? श्रीनगरच्या विमानतळाला निर्वासितांचा पडलेला प्रचंड गराडा मीं पाहिला आहे, व पंधरा-पंधरा दिवस विमानांत जागा न मिळाल्यामुळें वायकामुलें उघड्यावर थंडींत कुडकुडत आहेत अशा परिस्थितीमुळें निकरावर आलेल्या निर्वासितांच्या एका गराड्यानें विमानतळाकडे जाणारी आमची मोटर अडवून सत्याग्रह केला हेंही मला स्मरत आहे पण त्या परिस्थितींत असा प्रसंग उद्भवणें अस्वाभाविक होतें असें मला वाटत नाहीं.

मोटरवाहतुकीचें काय, असा यावर सहजच कोणीही प्रश्न करील. सामान्यपणें काश्मिरांत मोटरी भरपूर आहेत. पण युद्ध-कालांत सर्व उपलब्ध पेट्रोल लढाईच्या कामासाठीं हवें. मोटरीही जरूरीच्या सरकारी व लष्करी कामासाठीं हव्या म्हणून सरकारनें ताब्यांत घेतल्या आहेत. मुसलमान ड्रायव्हर परागंदा झाले म्हणून वंद पडलेल्या मोटरींची संख्याही कांहीं लहानसहान नाहीं. शेख अबदुल्लांच्या सरकारला एक दिवस श्रीनगरहून चाळीस मोटर ड्रायव्हर विमानानें जम्मूला आणवावे लागले.

बैलगाडी ही चीज काश्मिरांत दुर्मिळ आहे. एरव्हीं पंजाब निर्वासितांना जशी बैलगाडी उपकृत ठरली तशी ती काश्मिरांतही ठरली असती. उंट व घोडे काश्मिरांत आहेत, पण तेही भरपूर प्रमाणांत आहेत असें म्हणतां येणार नाहीं. तेव्हां वाटचाल हेंच

बहुसंख्य निर्वासितांचें हक्काचें आणि ताबडतोब उपलब्ध असें प्रवासाचें साधन आहे.

आखनूरच्या पश्चिमेस देव-बटाला विभागांत आक्रमकांनीं धुडगूस आरंभला तेव्हां जम्मूच्या दिशेनें लोकांची धांवपळ सुरू झाली. आखनूर शहराच्या पूर्वेस अर्धा मैल अंतरावर चिनाब नदीवर युवराज करणसिंह पूल नांवाचा ६५० फूट लांबीचा भव्य पोलादी पूल आहे. मिनिटास चाळीस याप्रमाणें निर्वासित या पुलावरून जम्मूकडे जात असतां एवढा अजस्र पूल पण तो देखील हेलकावत होता. सुमारें लाख लोकांनीं एका दिवसांत हा पूल ओलांडला. एखादा पाण्याचा अजस्र लोंढा यावा तसा लोकसमुदाय मला त्या वेळीं दिसला.

दोनच दिवसांनंतर भिंबर, मीरपूर, कोटली या भागांतील निर्वासितांचे थवे पूर्वी वर्णन केलेल्या डोंगराळ नौशेरा-जम्मू मार्गानें चाललेले मीं पाहिले. त्यांची परिस्थिति फारच केविलवाणी होती. 'अंगम् गलितम् पलितम् मुण्डम्' असे क्षीण, कमरेंत बांक भरलेले, जर्जर, वृद्ध त्यांत एकमेकांस आधार देत चालले होते. चालत असतांच कोवळ्या अर्भकांना पोटाशीं घेऊन दुग्धदान करणाऱ्या माता त्यांत होत्या. डोक्यावर सामानाचें गाठोडें व पाठकुळीशीं धाकटें भावंड बांधलेलें अशीं कोवळीं तरुण मुलें त्यांत होतीं.

एखादी मोटर जातांना दिसली तर या निर्वासितांच्या डोळ्यांत प्राण उभा राही व त्यांचे दीनवाणे चेहरे ओलांडून जातांना 'वज्रादपि कठोर' मन 'कुसुमादपि मृदु' होऊन जाई. नुसत्या अशक्त-अपंगांना मोटरींत घ्यावयाचें म्हटलें तरीदेखील त्यांच्यासाठीं शेकडों मोटरी लागाव्या अशी स्थिति !

निर्वासितांचा हा प्रश्नच प्रचंड आहे. एवढें मोठें बलाढ्य संघटित हिंदुस्थान सरकार, पण पंजाबच्या निर्वासितांच्या प्रश्नानें त्याचेही डोळे क्षणभर दिपवले. काश्मीरची अबदुल्ला-राजवट तर नुकतीच अस्तित्वांत आलेली, मग ती कांहीं काळ या प्रश्नानें गांगरली तर नवल काय ? पण काश्मीरांतही हा प्रश्न आतां पद्धतशीरपणें हाताळला जात आहे.

— ७ —

काश्मीरांत सध्यां संकटकालीन सरकार स्थापन करण्यांत आलें असून राष्ट्रीय परिषदेचे नेते शेख महंमद अबदुल्ला हे त्याचे प्रमुख आहेत. महाराज सर हरिसिंग आणि त्यांचे मुख्य प्रधान श्री. मेहेरचंद महाजन हेही तेथें आहेत. श्री. महाजन हे पूर्वी लाहोर हायकोर्टाचे न्यायाधीश होते. नाविक बंडाची चौकशी करण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें सर फाझल अली यांच्या अध्यक्षतेखालीं जें कमिशन नेमलें होतें त्याचे श्री. महाजन हे एक सभासद होते.

शेख अबदुल्ला यांचें काश्मीरांतील संकटकालीन सरकार व महाराज आणि महाजन यांचें प्रस्थापित सरकार यांचें म्हणावें तसें सूत नाहीं असा एक जोराचा प्रवाद काश्मीरांत ऐकूं येतो. हिंदी संघराज्यास काश्मीर सामील करून घेतांना हिंदुस्थान सरकारनें संस्थानांत शक्य तितक्या त्वरित लोकशाहीप्रधान राज्यतंत्र अंमलांत आलें पाहिजे अशी एक अट घातली होती. शेख अबदुल्ला व संकटकालीन सरकारांतील त्यांचे सहकारी हे सर्व लोकप्रतिनिधि, लोकनेते आहेत. पण काश्मीरच्या प्रस्थापित राज्यतंत्रांत इतर हितसंबंधांचा घनिष्टपणा बराच आहे. संकटकालीन व प्रस्थापित राज्य-

यंत्रांत कांहीं घासाघीस असलीच तर ती त्वरित काढून टाकली जाणें इष्ट व अत्यवश्य आहे. शेखसाहेब ही बाब सामोपचारानें मिटावी अशा उत्कट इच्छेचे आहेत. मग पोट दुखतें तें 'राजाचें कीं कोठवळ्याचें' एवढाच प्रश्न आहे.

शेख अबदुल्ला हे धर्मानें मुसलमान असले तरी वृत्तीनें पुरे राष्ट्रीय आहेत. हिंदुस्थान व पाकिस्तानच्या प्रधानमंडळांत काश्मीर-संबंधीं वाटाघाटी चालू असतां त्यांच्याशीं चर्चा करण्याचा मोका मला मिळाला होता. काश्मीरची फाळणी करण्याची सूचना पाकिस्ताननें केल्याची त्या वेळीं बातमी होती. पण शेख अबदुल्ला यांच्या चर्येवर त्या बातमीनें काडीमात्रही फरक पडला नाहीं.

"पं. नेहरू यांजवर आमचा अढळ विश्वास आहे" असें सांगून शेख अबदुल्ला म्हणाले, "पंडितजींच्या हातून आमचें काडीचेंही अनहित होणार नाहीं; आमचे हितसंबंध त्यांच्या हातांत संपूर्णतया सुरक्षित आहेत याबद्दल शंकाच नको."

काश्मीरांत मुसलमानेतर अल्पसंख्य आहेत हें जाहीरच आहे. अल्पसंख्याकांच्या सुरक्षिततेबद्दल बोलतांना शेखसाहेब म्हणाले, "माझ्या कुडींत जीव आहे तोंपर्यंत काश्मीरांत अल्पसंख्याकांच्या केसालाही मी धक्का लागू देणार नाहीं." हें बोलतांना त्यांची मुद्रा गंभीर होती व आवाजांत करारीपणा ओतप्रोत भरला होता.

जम्मू येथील माझ्या वास्तव्यांत काश्मीरच्या संस्थानी फौजेची वाताहत झाली आहे असा माझा ग्रह झाला. त्यांचा दम खचला आहे असें मला दिसून आलें. पाठीवर बंदुक टाकलेली, गळ्यांत काडतुसांचा पट्टा अडकविलेला, अंगावर लष्करी गणवेष पण अत्यंत

गचाळ अशा संस्थानी फौजेचे सैनिक अस्ताव्यस्तपणें भटकत असलेले पाहून कींव वाटली व रागही आला.

प्रारंभींच्या काळांत संस्थानी फौजेनें आक्रमकांना शौर्यानें तोंड दिलें. त्यांचा निभाव लागला नाहीं. याचा दोष ते अल्पसंख्य होते यासच दिला पाहिजे. अत्यंत कठीण परिस्थितींत शत्रूशीं झगडल्यानंतर त्यांना कांहीं विश्रांति मिळाली पाहिजे यांतही गैर कांहीं नाहीं. पण काश्मीरचा तुकड्यामागून तुकडा शत्रू घशांत घालत असतां रजेच्या सबबीवर या सैनिकांनीं अनिर्बंधपणें वणवण करीत सुटावें याला कांहींच अर्थ नाहीं.

या विश्रांतिकालांतही संस्थानी फौजेला कांहीं उपयुक्त कामगिरी करतां आली असती. निर्वासितांना मदत करण्याकडे त्यांचा खचित उपयोग झाला असता. पंचमस्तंभीयांच्या कारवाया उजेडांत आणून त्यांना नेस्तनाबूद करण्याचें काम या सैनिकांना करतां आलें असतें.

संकटकालीन सरकारनें संस्थानी फौजेची पुनर्घटना करण्याचें आतां ठरविलें आहे, हें योग्यच होय. इतकेंच नव्हे तर संस्थानांतील प्रत्येक सशक्त कर्त्या माणसाला कामाला लावायचें असेंही ठरलें आहे. काश्मीरांतील लढाईची परिस्थिति ध्यानांत घेतां, स्वस्थपणें बसून होईल तें पाहण्याची वेळ केव्हांच निघून गेली असून कंबरा जोरानें कसून सर्व युद्धप्रयत्न पणाला लावण्याची वेळ आतां पातली आहे हें स्पष्ट झालें आहे.

काश्मीरप्रकरणीं पाकिस्तानचे हात निर्मळ नाहींत. हातच्या कांकणाला आरसा कशाला हवा? युनोच्या सिक्युरिटी कौन्सिलकडे हिंदुस्थाननें आतां तक्रार केली आहे. पण हिंदुस्थानवर

प्रत्यारोप करून आपल्या दोषांवर पांघरूण घालण्याचेंच अद्याप पाकिस्तानचें धोरण दिसतें. अशा स्थितींत होकायंत्राचा कांटा युनोऐवजीं रणक्षेत्रावरच तरवारीच्या जोरानें हा प्रश्न निकालांत निघावा असा संभव दर्शवीत नाहीं काय ?

— ८ —

काश्मीरांतील विद्यमान लष्करी परिस्थितीचें वर्णन पुढीलप्रमाणें करतां येईल. काश्मीरच्या खोऱ्यांत उरीपर्यंत शत्रूला मागें रेटण्यांत आलें असून उरी-श्रीनगर टापू सुरक्षित आहे. उरीपासून दक्षिणेकडे पूंच, झांगर, नौशेरा, आखनूर अशी रेषा काढली तर या रेषेच्या पश्चिमेस शत्रूचें प्राबल्य असून त्याची तेथें जोराची हालचाल आहे. या रेषेच्या पूर्वेस रजौरी-चिंगस या भागांत एक छोटें शत्रुठाणें आहे व तेथेंही शत्रूची गडबड चालू आहे.

रजौरी-चिंगस भागांत शत्रूजवळ बरीच लूट आणि सुमारें १००० पळविलेल्या स्त्रिया आहेत असें म्हणतात. भिंबर भागांतील मुख्य शत्रुसेनेला मिळण्याचे रजौरी-चिंगस भागांतील शत्रुसेनेचे प्रयत्न जोरांत आहेत. मोंगल-काळांत गुजरात-झेलम भागांतून भिंबर, नौशेरा, रजौरी, ठण्णा मंडी व शपियां या मार्गानें श्रीनगरला जाण्याचा एक व्यापारी रस्ता होता. हा रस्ता जोडण्याचे सध्या शत्रूचे प्रयत्न दिसतात.

पण शत्रूच्या या दोन तुकडयांची भेट व्हावयाची म्हणजे त्यांनीं आधीं आखनूर-नौशेरा रस्ता तोडला पाहिजे. या रस्त्यावर हिंदी सैन्याचा पुरा कबजा आहे. बेरीपट्टणच्या आग्नेयीस हा रस्ता पार

होण्याचे शत्रूनें आजवर अनेक प्रयत्न केले व प्रत्येक वेळीं भयंकर मार खाऊन त्याला पळ काढावा लागला.

हिंदी सैन्याला सरळ तोंड देण्याचें आक्रमकांनीं कधींच धैर्य दाखविलें नाहीं. हिंदी सैन्याची नुसती दृष्टिभेट होतांच तोंड फिरवून पळ काढण्यांतच त्यांनीं आपली युद्धकला प्रकट केली आहे. अलीकडे अलीकडे लढाईला जसा रंग भरूं लागला तसे एकदोन संघटित हल्ले त्यांनीं हिंदी सेनेवर केले; अर्थात् त्यांची डाळ शिजूं शकली नाहीं हा प्रश्न निराळा. शिवाय गनिमी काव्याच्या लढाईला हा डोंगराळ प्रदेश फार चांगला हीही गोष्ट विसरून चालणार नाहीं.

बराच काळ हिंदी सैन्याचें धोरण बचावाचें होतें. आतां चढाईच्या धोरणाचा अवलंब करण्यांत आला आहे. चढाईच्या धोरणाला विलंब लागला असें सकृद्दर्शनीं वाटण्यासारखें आहे, पण वाहतुकीच्या साधनांचा अभाव हेंच त्याचें कारण होय. विमानवाहतुक अनिश्चित कालपर्यंत उपयोगांत आणणें शक्य नाहीं. शिवाय हिंवाळ्यांत तिची उपयुक्तता साहजिकच निर्बंधित.

रस्त्यानें वाहतुक एवढाच त्यानंतर मार्ग. पूंच-मीरपूर भागांतील आमच्या सैन्याला रसद पोचण्याचा जो आखनूर-नौशेरा रस्ता त्याचें वर्णन मीं पूर्वीं केलेंच आहे. हिंदुस्थानहून मदत यावयाची ती पूर्व पंजाबच्या गुरुदासपूर जिल्ह्यांतील पठाणकोटपासून. जम्मूपर्यंतचा रस्ताही डागडुजी, पूल वगैरे कारणांमुळें अवघड आहे.

तथापि या अडचणींना न जुमानतां हिंदी सैन्यासाठीं शस्त्रास्त्रसामग्री प्रत्यहीं काश्मीरांत दाखल होत आहे. आमच्या सैन्यानें कित्येक मजबूत ठाणीं हातीं ठेवलीं असून तेथून दररोज आमच्या तुकडया

शत्रुसेनेचा पाठलाग करून सप्पा उडवितात. हिंदी विमानदलही उत्कृष्ट कामगिरी बजावीत आहे. आमचीं लढाऊ विमानें टेहळणीचें काम तर करतातच, पण आमच्या तुकड्यांना संरक्षण देणें आणि शत्रुपक्षीय जमावांवर व त्यांच्या ठाण्यांवर अचूक बॉंबफेक करणें हींही कामें त्यांनीं चांगल्या रीतीनें बजावलीं आहेत. हल्लीं आमचीं विमानें— हॉवर्ड, टॅंपेस्टस् व स्पिटफायर्स— शत्रूवर रॉकेटस्-बॉंब व एक-हजार-पौंडी गोळेही कधीं कधीं टाकतात.

आक्रमकांचें निर्दालन करण्याचा प्रश्न आतां काश्मीर सरहद्दी-पुरताच मर्यादित नाहीं. काश्मीर सरहद्दीलगत पाकिस्तान मुलुखांतून आक्रमकांना सर्वतोपरी साहाय्य मिळतें. तेथें त्यांच्या छावण्या आहेत व त्यांचें तेथून उच्चाटन झाल्याखेरीज आक्रमकांचें पुरतें कंबरडें मोडलें जाणार नाहीं व काश्मीरच्या राशीस बसलेले ग्रह सुटणार नाहींत.

— ९ —

ऑक्टोबर १९४७ च्या अखेरीस काश्मीरांतील मुलकी सत्ता नष्टप्राय झाली होती. पण शेख अबदुल्ला आणि त्यांचे सहकारी यांनीं तावडतोब संकटकालीन सरकार बनवून राज्ययंत्राचीं सूत्रें हातीं घेतलीं व विस्कटलेली घडी बसविली. शेखसाहेबांचे उजवे हात बक्षी गुलाम महंमद यांना जम्मू प्रांताचे सर्वाधिकारी नेमण्यांत आलें. राष्ट्रीय परिषदेनें होम गार्डस् आणि शांततापथकें यांसाठीं स्वयंसेवक नोंदण्याची योजना आंखली तिला अखिल काश्मिरी लोकांकडून चांगलें सहकार्य मिळालें. एका जम्मू शहरांत पहिल्याच दिवशीं २००० स्वयंसेवक व स्वयंसेविकांनीं नांवें नोंदविलीं.

आक्रमकांवर पाकिस्तानचा वरदहस्त आहे याबद्दल इतके दिवस शंकाच नव्हती व आतां तर हिंदुस्थान सरकारनें युनोच्या आंतरराष्ट्रीय न्यायासनासमोर त्या आरोपाबद्दल पाकिस्तानला खेचलेंच आहे.

आक्रमकांनीं काश्मीरांत जे अत्याचार केले ते माणुसकीला लाजविणारेच होते. भस्मासुर मोकाट सुटावा तसें आक्रमकांनीं हातीं लागेल तें गारद कर असा सपाटा लावला. बारामुला, पट्टण हीं गांवें आजही आक्रमकांच्या अमानुष करणीची साक्ष देतात.

बारामुलांतील झेलम नदीच्या पुलावरून साठ स्त्रियांनीं केवळ अब्रू वांचावी म्हणून झेलमच्या पात्रांत उड्या घेतल्या असें तेथील भगिनींनीं आम्हांला सांगितलें. डोक्यावर वस्तरा फिरवून आणि दाढीचे केस तुरपून जबरदस्तीनें मुसलमान गनी शेख बनविलेल्या ग्यानसिंग नांवाच्या एका शिखानें आपली कर्मकथा आम्हांला सांगितली. देवा बटाला, भिंबर, मीरपूर, कोटली, झांगर येथील निर्वासितांनींही आक्रमक व त्यांचे पंचमस्तंभी साहाय्यक यांनीं केलेल्या अत्याचारांचें वर्णन केलें तें अंगावर शहारे आणण्यासारखेंच होतें.

काश्मीरवरील आक्रमकांचा पुरता निःपात होऊन काश्मीरबाहेर त्यांना काढलें जाईल हें निश्चित आहे. हिंदी संघराज्यास काश्मीर सामील करून घेतांनाच हिंदुस्थाननें अशी अट घातली आहे कीं, शक्य तितक्या लवकर काश्मीरांत लोकसत्ताधिष्ठित राज्यतंत्र स्थापन झालें पाहिजे. शेख अबदुल्ला हे राजशाहीचे विरोधक नाहींत. पण ती राजसत्ता इंग्लंडच्या राजसत्तेसारखी सनदशीर आणि लोकमतानुवर्ती हवी. अनियंत्रित राजसत्तेला या युगांत खुद्द संस्थानिक आणि त्यांचे तोंडपुजे यांखेरीज कोण पुरस्कर्ते मिळणार ?

सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं काश्मीरचें भवितव्य काश्मीरच्या जनतेनेंच ठरविलें पाहिजे यावर हिंदुस्थान सरकारचा कटाक्ष आहे. लोकमताचाच अखेर विजय झाला पाहिजे. आक्रमकांनीं पादाक्रांत केलेल्या प्रदेशांतील काश्मिरी रहिवाशांनीं पाकिस्तानची जी चव चाखली ती पाहतां कोणताही काश्मिरी स्वप्नांत देखील पाकिस्तानला काश्मीर सामील व्हावें असें म्हणणार नाहीं, मग तो मुसलमान असो, हिंदु असो वा शीख असो " सलाम असो या पाकिस्तानला व तोही दुरूनच " असेच उद्गार केव्हांही त्याच्या तोंडांतून बाहेर पडतील.

उलट काश्मीर व हिंदुस्थान यांचे संबंध पुरातन व सदैव सलोख्याचे आहेत. काश्मीरच्या प्राणावर बेतली असतां थोरल्या भावाप्रमाणें हिंदुस्थान सरकार काश्मीरच्या मदतीला धावून गेलें, काळ-वेळ-श्रम-पैसा कशाचाही विचार केला नाहीं याचें ऋण काश्मीर केव्हांही विसरणार नाहीं.

वसाहत पार्लमेंटपुढील आपल्या निवेदनांत पं. जवाहरलाल नेहरू म्हणालेच,

" काश्मीर व हिंदुस्थान यांचे संबंध अतिशय पुरातन व अनेक प्रकारचे आहेत. गेल्या कांहीं आठवड्यांत त्या दोघांत आणखी एक दुवा निर्माण झाला आहे व कोणीही तो दुवा तोडूं शकणार नाहीं. "

जय हिंद ! जय काश्मीर !

— १० —

काश्मीरवरील आक्रमकांना पाकिस्तानची फूस आहे इतकेंच नव्हे तर त्यांना पाकिस्तान सक्रिय साहाय्यही देत आहे अशी तक्रार हिंदुस्थाननें आतां युनोच्या सिक्युरिटी कौन्सिलकडे केली आहे.

या आंतरराष्ट्रीय संघटनेची या प्रश्नांत मदत घेण्यापूर्वी हिंदुस्थानच्या प्रतिनिधींनीं पाकिस्तान सरकारशीं प्रत्यक्ष वाटाघाट केली नाहीं असें नाहीं. डिसेंबरच्या प्रारंभीं हिंदुस्थान व पाकिस्तान सरकारच्या जबाबदार मंत्र्यांमध्यें काश्मीरचा प्रश्न चर्चिला जात होता. आक्रमकांचा व पाकिस्तानचा काडीइतकाही संबंध नाहीं असें हिंदुस्थान सरकारच्या आक्षेपांना पाकिस्तानचें उत्तर होतें. पण या लंगडया उत्तरानें कोणाचेंही समाधान झालें नाहीं.

पण एकीकडे काश्मीरवरील आक्रमणाची प्रत्यक्ष जबाबदारी नाकारीत असतांच पाकिस्तानतर्फे काश्मीर हिंदुस्थानला सामील झालें याबद्दल जोराची तक्रार करण्यांत येत होती. लबाडीच्या मार्गानें काश्मीर जोडून घेतलें असें अजूनही पाकिस्तानचे पंतप्रधान मि. लियाकतअल्ली म्हणतात !

हिंदुस्थानप्रमाणेंच काश्मीरचीही फाळणी करावी व मुसलमान बहुसंख्य लोकवस्ती असलेले संस्थानचे भाग पाकिस्तानला जोडावे अशीही सूचना या वाटाघाटींत एकदां करण्यांत आली होती असें म्हणतात. एवींतेवीं या भागांवर आज आक्रमकांचाच कबजा आहे, काश्मीरचें राज्य आज तेथें अस्तित्वांतच नाहीं, असा त्यामागें युक्तिवाद होता. पण हा युक्तिवाद मुळांतच भ्रामक आहे. जबरदस्तीनें

कवजा प्रस्थापित करणाराला मिळकतीचा तावा द्यावयाचा हें तत्त्वच मुळीं न्याय व निसर्ग यांना विसंगत आहे.

या वाटाघाटींत पाकिस्तानचें धोरण अन्याय्य व जुलमी आहे हें स्पष्ट झाल्यावर डिसेंबरच्या २२ तारखेस हिंदुस्थान सरकारमार्फत पाकिस्तानचे पंतप्रधान मि. लियाकतअल्ली खान यांना एक रीतसर खलिता सादर करण्यांत येऊन पाकिस्तानमार्फत आक्रमकांना यत्किंचितही मदत मिळूं नये व मिळत असेल ती ताबडतोब बंद करण्यांत यावी अशी विनंति करण्यांत आली. दोन स्मरणपत्रें लिहूनही या विनंतीला एक आठवडाभर पाकिस्तानकडून कांहींच उत्तर आलें नाहीं. अखेर डिसेंबरच्या ३० तारखेस हिंदुस्थान सरकारनें याबाबत युनोच्या सिक्युरिटी कौन्सिलकडे दाद मागण्याचें ठरवून १९४७ सालच्या अखेरच्या दिवशीं ३१ तारखेस आपला विनंति अर्ज रवाना केला.

काश्मीर प्रकरणाची थोडक्यांत हकीकत देऊन या अर्जांत पुढील गोष्टी त्यावरून स्पष्ट होतात असें म्हटलें आहे:—

( अ ) आक्रमकांना पाकिस्तान मुलुखांतून जाऊ देण्यांत येतें;

( ब ) पाकिस्तान प्रदेशांत त्यांना लढाईचे तळ ठेवूं देण्यांत येतात;

( क ) आक्रमकांत पाकिस्तानचे नागरिक आहेत;

( ड ) आक्रमकांना पुष्कळसें लष्करी साहित्य, वाहतुकीचीं साधनें व इतर सामग्री ( यांत पेट्रोल समाविष्ट आहे ) पाकिस्तानांतून मिळतें; व

( ई ) पाकिस्तानचे अधिकारी आक्रमकांना शिक्षण देणें, त्यांचें मार्गदर्शन करणें व त्यांना इतर प्रकारें साहाय्य करणें या गोष्टी करीत आहेत.

पाकिस्तानवर वरील आरोप करून हिंदुस्थाननें सिक्युरिटी कौन्सिलला अशी विनंति केली कीं कौन्सिलनें पाकिस्तानला पुढील गोष्टी करण्याचा आदेश द्यावा:—

( १ ) जम्मू व काश्मीर संस्थानवरील आक्रमणांत पाकिस्तानच्या लष्करी वा मुलकी सरकारी नोकरवर्गाला भाग घेण्याची वा त्यांत मदत करण्याची मनाई करणें;

( २ ) जम्मू व काश्मीर संस्थानांत चाललेल्या युद्धांत पाकिस्तानच्या नागरिकांनीं भाग घेऊं नये अशी विनंति करणें; आणि

( ३ ) काश्मीरवरील आक्रमकांना पुढील गोष्टी नाकारणें—

( अ ) काश्मीरविरुद्ध मोहिमेसाठीं पाकिस्तान प्रदेशांत प्रवेश करणें अगर पाकिस्तान प्रदेशाचा तळाप्रमाणें उपयोग;

( ब ) लष्करी व इतर साहित्याची मदत; व

( क ) जेणेंकरून काश्मीरची मोहीम लांबेल अशी कोणतीही इतर प्रकारची मदत.

# काश्मीर प्रकरणांतील कांहीं महत्त्वाच्या घडामोडी

२७ आक्टो. १९४७ : काश्मीर हिंदी संघराज्यांत सामील. टोळीवाल्यांची आक्रमक धाड थांबवण्यासाठीं हिंदी लष्कर काश्मीरमध्यें रवाना.

३१ आक्टो. : शेख अबदुल्ला काश्मीरचे हंगामी पंत प्रधान. ' टोळीवाल्यांना पाकिस्तानांतून प्रवेश देऊं नका ' असा हिंद सरकारचा पाकिस्तानला इषारा, पाकिस्तानचा नकार.

५ नोव्हें. : 'काश्मीरच्या खोऱ्यांत पाकिस्तानचे थडगें खणलें जाईल' शेख अबदुल्लांची दिल्ली येथील गर्जना.

११ नोव्हेंबर : पं. नेहरू यांची काश्मीरला भेट. ' हिंद काश्मीर एकजूट कायम राहील. ' पं. नेहरूंचे हिंद सरकारतर्फे काश्मिरी जनतेस आश्वासन.

२ डिसें. : 'हिंदी संघराज्याच्या मदतीमुळेंच काश्मीर बचावतें' काश्मीर महाराजांचें रेडियोवरील भाषण.

२२ डिसें. : काश्मीर प्रकरणांतील हिंद पाकिस्तान वाटाघाटी कायमच्या फिसकटल्या.

३० डिसें. : संयुक्त राष्ट्रसंघापुढें काश्मीर प्रकरण नेण्याचा हिंद सरकारचा निर्णय.

१५ जाने. १९४८ : काश्मीर प्रकरण युनोपुढें आलें. हिंदचे प्रतिनिधि श्री. अय्यंगार यांनीं आपलें आरोपपत्र सभेपुढें मांडलें.

१६ जाने. : पाकिस्तानतर्फे झाफरुल्लाखान यांचें हिंदचे आरोपांस उत्तर— नवे आरोप.

२२ जाने. : हिंदचे दुसरे प्रतिनिधि श्री. मोतीलाल सेटलवाड यांचें झाफरुल्ला खानांचे आरोपांस प्रत्युत्तर.

म. ग्रं. सं. ठाणे.

३१५८०

बा-वा

IRBK-0103159

IRBK-0103159